ePaper

**सोनम वांगचुक यांच्या उपोषणावर राहुल गांधींची पहिलीच प्रतिक्रिया**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 19 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

कामात हलगर्जीपणा केलात, तर सुट्टी नाही!

## बंडखोर खासदारांचा निर्णय आला, लोकसभा अध्यक्षांची मंजुरी

# उद्धव ठाकरेंना झटका!




**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑपरेशन टायगर यशस्वी करत उद्धव ठाकरेंना धक्का दिला. एकदोन नव्हे, तर तब्बल सहा खासदार शिंदेंनी स्वतःच्या पक्षात यश मिळवले. पण, सहा खासदारांच्या बंडानंतर ठाकरेंनी लोकसभा अध्यक्षांच्या कोर्टात धाव घेतली. या खासदारांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात केली गेली होती. लोकसभा अध्यक्षांनी खासदारांच्या गटाच्या विलिनीकरणाला मान्यता दिली आहे.**

पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे २० खासदार आणि उद्धवसेनेच्या ६ खासदारांनी बंडखोरी केली. दोन्ही पक्षातील खासदारांचे गट दुसऱ्या पक्षात विलीन झाले. उद्धवसेनेचे ६ खासदार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच विलीन झाले. त्यांच्या विलिनीकरणास लोकसभा अध्यक्षांनी परवानगी दिली. उद्धवसेनेचे ओमराजे निंबाळकर,संजय देशमुख,संजय जाधव,संजय दिना पाटील, नागेश आष्टीकर, भाऊसाहेब वाकचौर यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. आता ते अधिकृत शिंदेसेनेचे खासदार बनले आहेत. त्यामुळे शिंदेसेनेच्या खासदारांची संख्या १३ वर पोहोचली आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले की, "ऑपरेशन टायगर हे नाव माध्यमांनीच दिले आहे. मी तर हेच म्हणेन की, मागील तीन वर्षात जे लोक सोबत जोडले जात आहेत. ते विश्वासाने जोडले जात आहेत. आम्ही कुणालाही तोडत नाहीये. आम्ही जोडणारे लोक आहोत. त्यांना शिवसेनेवर विश्वास आहे. लोक त्यांना निवडून पाठवतात, तर त्यांच्या मतदारसंघात विकासकामे झाली पाहिजेत. जनतेला न्याय देण्यासाठी ते सोबत आले आहेत. त्यांच्या मतदारसंघात कामे होतील", असे एकनाथ शिंदे लोकसभा अध्यक्षांनी दिलेल्या निर्णयानंतर बोलताना म्हणाले.

### सहा खासदार नेमकं कोणते?

शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या ६ खासदारांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. या सहा खासदारांमध्ये ओमराजे निंबाळकर, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर यांचा समावेश आहे.

### ‘ऑपरेशन टायगर’ यशस्वी

या ६ खासदारांनी शिंदेंच्या सेनेत प्रवेश केल्यामुळे ‘ऑपरेशन टायगर’ यशस्वी झाल्याचा दावा शिंदेंच्या सेनेकडून केला जातो. मात्र, या ६ खासदारांच्या फुटीमुळे उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसल्याचं बोललं जात होतं. या सर्व घडामोडीवरून आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे.उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून फुटून शिंदेंच्या सेनेत प्रवेश केलेल्या ६ बंडखोर खासदारांच्या शिंदे सेनेतील विलीनीकरणा लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंजुरी दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा आणखी एक मोठा धक्का मानला जात आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

# क्वांटम तंत्रज्ञानामुळे काय होणार?

## एआय आणि सेमीकंडक्टरमुळे भविष्यात ७५ ते ८० टक्के रोजगारांवर प्रभाव पडणार

महाईन्यूज । पुणे

**‘कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सेमीकंडक्टर आणि क्वांटम तंत्रज्ञान हे भविष्यातील अर्थव्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ ठरणार आहेत. या क्षेत्रांसाठी सक्षम मनुष्यबळ तयार करण्यासाठी महाराष्ट्राने व्यापक तयारी सुरू केली आहे. राज्यातील शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि उद्योग यांच्या सहकार्याने क्वांटम तंत्रज्ञानाच्या विकासासाठी सक्षम परिसंस्था (इकोसिस्टीम) विकसित करण्यात येत आहेत,’ अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**



भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेतील (आयसर पुणे) ‘एमक्यूटीएम फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम इन क्वांटम टेक्नॉलॉजी’ या विषयावरील प्राध्यापकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपावेळी फडणवीस बोलत होते. ‘मित्रा’चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, आयसर पुणेचे संचालक प्रा. सुनील भागवत, आय-हब क्वांटम टेक्नॉलॉजी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुंज टंडन या वेळी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, ‘विदा हे आजच्या काळातील इंधन आहे. विदावर वेगवान प्रक्रिया करण्याची क्षमता असणे जास्त महत्त्वाचे आहे. विदा प्रक्रिया, क्वांटम संगणन आणि डिजिटल तंत्रज्ञान या तीन घटकांवर भविष्यातील विकासाचा वेग अवलंबून असेल. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि संशोधकांना या बदलासाठी तयार करण्याची आवश्यकता आहे. राज्य सरकारने राष्ट्रीय क्वांटम मोहिमेशी सुसंगत असे ‘महाराष्ट्र क्वांटम मिशन’ राबवण्याचा निर्णय घेतला आहे. आयसर, टाटा मूलभूत संशोधन संस्था (टीआयएफआर), आयआयटी मुंबई, सीओईपी आणि अन्य संस्थांच्या सहकार्याने संशोधन, शिक्षण आणि उद्योग यांना जोडणारी सक्षम परिसंस्था उभारण्यात येत आहे. या माध्यमातून पुढील वर्षांत किमान ५०० प्रशिक्षित क्वांटम तज्ज्ञ तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.’ ‘गेल्या काही वर्षांत राज्याने धोरणात्मक आणि नियामक सुधारणा करून उदयोन्मुख तंत्रज्ञानासाठी पोषक वातावरण निर्माण केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅटबॉट आणि अत्याधुनिक डिजिटल साधनांचा शिक्षणात प्रभावी वापर करून महाराष्ट्राला भविष्यातील ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेचे अग्रगण्य केंद्र बनविण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे.

### क्वांटम तंत्रज्ञान काय आहे?

‘क्वांटम तंत्रज्ञान हे केवळ संगणक विज्ञानापुरते मर्यादित नाही. या तंत्रज्ञानामुळे अभियांत्रिकी, वैद्यकीय, संरक्षण, दळणवळण, वित्तीय सेवा आणि संशोधन अशा विविध क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडवणार आहेत. त्यामुळे बहुविषयक शिक्षण आणि कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात येत आहे. पुढील काळात ७५ ते ८० टक्के रोजगारांवर तंत्रज्ञानाचा प्रभाव असेल. कौशल्यांचा कालावधी झपाट्याने बदलत असून, युवकांनी सातत्याने नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. केवळ पदवी पुरेशी राहणार नाही.

# कात्रजमधील लॉजवर पोलिसांचा छापा; देहव्यापारातून दोन तरुणींची सुटका

महाईन्यूज । पुणे

**कात्रज परिसरातील एका लॉजमध्ये सुरू असलेल्या देहव्यापारावर भारती विद्यापीठ पोलिसांनी छापा टाकून परराज्यातील दोन तरुणींची सुटका केली. याप्रकरणी देहव्यापारासाठी मुलींचा पुरवठा करणारा दलाल तुकाराम दत्ता मनाळे (वय २२, रा. सध्या तीन हत्ती चौक, संभाजीनगर, धनकवडी; मूळ रा. किल्लारी, ता. निलंगा, जि. लातूर) याला अटक करण्यात आली असून, त्याच्या साथीदारांचा शोध सुरू आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कात्रज भागातील एका लॉजमध्ये व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून महिलांचे फोटो पाठवून ग्राहकांना आमिष दाखवले जात असल्याची गोपनीय माहिती भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मानसिंग पाटील यांना मिळाली होती.

त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहक तयार करून सापळा रचला. दलाल तुकाराम मनाळे याच्याशी संपर्क साधल्यानंतर त्याने ग्राहकांना कात्रजमधील संबंधित लॉजमध्ये बोलावले. ठरलेल्या ठिकाणी व्यवहार निश्चित होताच पोलिसांच्या पथकाने तातडीने छापा टाकला. कारवाईदरम्यान लॉजमधून परराज्यांतील दोन पीडित तरुणींची सुखरूप सुटका करण्यात आली.

त्यानंतर पीडित महिलांकडे चौकशी करून तुकाराम मनाळे व त्याच्या साथीदारांविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात अनैतिक मानवी वाहतूक व देहव्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई पोलिस उपायुक्त मिलिंद मोहिते, सहाय्यक पोलिस आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक मानसिंग पाटील, पोलिस उपनिरीक्षक नीलेश मोकाशी, अंमलदार राहुल शेडगे, सचिन सरपाले, नीलेश खैरमोड, मितेश चोरमोले, अभिनय चौधरी, सागर बोरगे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

पोलिसांनी लॉज परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल फोन आणि इतर महत्त्वाचे पुरावे जप्त करून तपास सुरू केला आहे. या रॅकेटमध्ये आणखी काही दलाल किंवा लॉज चालकांचा सहभाग आहे का, याचाही पोलिसांकडून सखोल तपास करण्यात येत आहे. पीडित तरुणींना आवश्यक वैद्यकीय तपासणी करून समुपदेशनासाठी संबंधित यंत्रणेकडे पाठविण्यात आले आहे.

### मानवी तस्करीचे जाळे

आरोपी महिलांना पैशांचे आमिष दाखवून देहव्यापारासाठी भाग पाडत असल्याचा प्राथमिक तपासात संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणामागे आंतरराज्य मानवी तस्करीचे मोठे जाळे कार्यरत असल्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे. आरोपींच्या मोबाईलमधील व्हॉट्सअॅप चॅट, कॉल रेकॉर्ड आणि आर्थिक व्यवहारांची माहितीही पोलिस तपासत आहेत. अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांविरोधात कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# पवना धरण ७७ टक्के भरले, तरी पाणीकपात

## धरण साठा वाढला; जलसंपदा विभागाच्या सूचनेनुसार १५ टक्के पाणी कपात कायम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या आठवड्यात जोरदार पाऊस होऊन पवना आणि इंद्रायणी नदीस पूर आला होता. तसेच, पवना धरण 77 टक्के भरले आहे. असे असतानाही शहरात सुरू असलेली 15 टक्के पाणी कपात यापुढेही सुरूच राहणार असल्याने प्रशासनाने जाहीर केले आहे.**



जून महिना संपला तरी, पावसाळा सुरू न झाल्याने तसेच, शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात केवळ 16 टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने 15 टक्के पाणी कपात सुरू केली होती. ती कपात शहरात 19 जूनपासून सुरू करण्यात आली होती. त्यामुळे शहरात नेहमीपेक्षा अर्धा ते एक तासाने पाणी कमी सोडण्यात येत आहे. त्यामुळे शहरातील अनेक भागांत पाणीटंचाईचा सामना करावा लागला. मात्र, जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून पावसाने जोरदार हजेरी लावली. पाच व सहा जुलैला झालेल्या धुवाधार पावसामुळे पवना आणि इंद्रायणी नदीस पूर येऊन अनेकांच्या घरात तसेच, हाऊसिंग सोसायट्यांत पाणी शिरले. पवना धरणात अल्पावधीतच तब्बल 77.28 टक्के भरले आहे. त्यामुळे पाणी कपात रद्द होईल, अशी शहरवासीयांना आशा होती. मात्र, एल निनोचा प्रभाव कमी झाला नसून, पाण्याचे आतापासूनच नियोजन करून काटकसरीने पाण्याचा वापर करण्याची सूचना जलसंपदा विभागाने महापालिकेस केली आहे. तसेच, पाणी कपात कायम ठेवण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे महापालिकेने पाणी कपात मागे घेतलेली नाही.

पिंपरी-चिंचवड शहरात पाणी कपात लागू केल्यानंतर पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले होते. शहरात पाण्याची नासाडी तसेच, अपव्यय करणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी पाणीपुरवठा विभागास दिले होते. त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय पथकेही नेमण्यात आले होते. आत्तापर्यंत एकाही व्यक्तीवर कारवाई करण्यात आली नसल्याचे पाणीपुरवठा विभागाने सांगितले आहे. शहरात अंगण, रस्ते, पार्किंग तसेच, वाहने धुणे, टाकी भरून वाहने असे प्रकार कायम आहेत. उघडेपणे पाण्याची नासाडी केली जात आहे. शहरात ठिकठिकाणी खुलेआमपणे वाहन धुताना दिसतात. धरणातील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली असली तरी भविष्यातील पावसाचा अनिश्चित अंदाज लक्षात घेता महापालिका सध्या कोणताही धोका पत्करण्याच्या भूमिकेत नाही. पाणीटंचाईची परिस्थिती पुन्हा उद्भवू नये, यासाठी नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर अत्यावश्यक गरजांपुरताच मर्यादित ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### ऑक्टोबरपर्यंत धरणात 100 टक्के साठा असल्यास पाणी कपात रद्द

पिंपरी-चिंचवड शहरात सुरू असलेली 15 टक्के पाणी कपात कायम ठेवण्यात येणार आहे. ऑक्टोबरपर्यंत धरणात शंभर टक्के पाणीसाठा असल्यानंतरच ती कपात रद्द केली जाईल. अन्यथा कपात पुढेही कायम ठेवण्यात येणार आहे. सध्या पाणी कपात असली तरी, नागरिकांच्या तक्रारींचे प्रमाण बरेच कमी झाले आहे, असे महापालिकेचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले. पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांविरोधात कारवाईचे आदेश असले तरी प्रत्यक्षात नियमांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने नागरिकांकडूनही नाराजी व्यक्त केली जात आहे. पाणी ही सामूहिक संपत्ती असल्याने प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने पाण्याचा वापर केल्यास भविष्यातील संभाव्य जलसंकट टाळण्यास मोठी मदत होऊ शकते.

---

# संघटनात्मक बळकटीसाठी पिंपरी-चिंचवड भाजपाची महत्त्वाची जिल्हा बैठक






**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याची अत्यंत महत्त्वाची जिल्हा बैठक रविवार, दि. 19 जुलै 2026 रोजी सकाळी 9.30 वाजता कासारवाडी येथील हॉटेल कलासागर येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती भाजपा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी दिली.**

या बैठकीत भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण हे प्रमुख मार्गदर्शन करणार असून, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील हेही उपस्थित राहणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका, संघटनात्मक बांधणी, बूथस्तरावरील नियोजन तसेच पक्षाच्या विविध उपक्रमांबाबत या बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा होण्याची शक्यता आहे.

बैठकीस भाजपा महाराष्ट्र प्रदेशचे सरचिटणीस राजेश पांडे आणि निरंजन डावखरे, पश्चिम महाराष्ट्राचे संयोजक विक्रम पावसकर तसेच पिंपरी-चिंचवड जिल्ह्याचे प्रभारी भरत नाना पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कोअर समितीचे सदस्य, सर्व आजी-माजी खासदार व आमदार, राज्य परिषदेचे सदस्य, सर्व जिल्हा पदाधिकारी, नगरसेवक, माजी नगरसेवक, मनपा निवडणूक इच्छुक उमेदवार, मोर्चे, आघाडी, प्रकोष्ठ व सेलचे अध्यक्ष, मंडल अध्यक्ष, विधानसभा बीएलए-1 तसेच पदवीधर व शिक्षक नोंदणी प्रमुख यांनी बैठकीस पूर्णवेळ उपस्थित राहावे, असे आवाहनही शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी केले आहे.

"पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत करण्यासाठी तसेच आगामी राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पक्षाच्या प्रत्येक पदाधिकाऱ्याने व कार्यकर्त्यांने या बैठकीत सहभागी होऊन संघटनात्मक जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडावी," असे शत्रुघ्न (बापू) काटे यांनी म्हटले आहे.

> "भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बांधणीसाठी आणि आगामी राजकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही जिल्हा बैठक अत्यंत महत्त्वाची आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांने बैठकीस पूर्णवेळ उपस्थित राहून पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी योगदान द्यावे. संघटनात्मक कामगिरी आणि बूथस्तरावरील सक्षमीकरणावर या बैठकीत विशेष भर दिला जाणार आहे."
>
> **- श्री शत्रुघ्न (बापू) काटे,**
> जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा.



## भूमिका

# होर्मुझ पुन्हा रणांगणावर; सामंजस्य करार कोसळला



**अमेरिका आणि इराण यांच्यात महिनाभरापूर्वी झालेला सामंजस्य करार अखेर निष्फळ ठरला असून होर्मुझच्या सामुद्रधुनीत पुन्हा युद्धाची ठिणगी पडली आहे. करारानंतर काही व्यापारी जहाजांनी इराणशी समन्वय न साधता अमेरिका आणि ओमानने मान्य केलेल्या दक्षिण मार्गाचा वापर सुरू केला.**

हा मार्ग इराणने अद्याप प्रतिबंधित मानला होता. करारात याबाबत स्पष्टता नसल्याने इराणने याला थेट उल्लंघन मानत व्यापारी जहाजांवर हल्ले सुरू केले आणि संघर्ष पुन्हा भडकला.

१७ जूनपासून ६० दिवसांच्या शस्त्रसंधीच्या उद्देशाने झालेल्या करारानुसार इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून जहाजांना सुरक्षित मार्ग देण्याचे, तर अमेरिकेने इराणी तेलावरील निर्बंध आणि नौदल नाकेबंदी शिथिल करण्याचे मान्य केले होते. त्यानंतर स्वित्झर्लंडमध्ये दीर्घकालीन शांतता करारासाठी चर्चा अपेक्षित होती. मात्र लेबनॉनमधील संघर्ष, प्रादेशिक तणाव आणि परस्पर अविश्वासामुळे वाटाघाटी ठप्प झाल्या.

या संघर्षाचा सर्वाधिक परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होत आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून जगातील मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि खतांची वाहतूक होते. त्यामुळे वाहतूक विस्कळीत झाल्याने ऊर्जा दर, खतांच्या किमती आणि वाहतूक खर्च झपाट्याने वाढले आहेत. आशियाई देशांसमोर महागाई, ऊर्जा टंचाई आणि औद्योगिक मंदीचे संकट निर्माण झाले आहे. आफ्रिका आणि आशियातील स्थलांतरित कामगारांच्या उत्पन्नावरही परिणाम होत असून अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर त्याचा विपरीत परिणाम दिसून येत आहे.

या संपूर्ण घडामोडींचे मूळ कारण म्हणजे अमेरिका आणि इराण यांच्यातील दीर्घकालीन विश्वासाचा अभाव. २०१५ च्या अणुकरारानंतर निर्बंध हटवणे आणि पुन्हा लागू करणे या अनुभवामुळे इराण अमेरिकेच्या आश्वासनांबाबत साशंक आहे. दुसरीकडे अमेरिका इराणच्या प्रत्येक हालचालीकडे संशयाने पाहत असल्याने सामंजस्य कराराची अंमलबजावणी सुरुवातीपासूनच डळमळीत राहिली.

या युद्धामुळे इराणच्या हातात होर्मुझ सामुद्रधुनी हे प्रभावी सामरिक आणि आर्थिक अस्त्र आले आहे. भविष्यात या मार्गावरील नियंत्रण आणि वाहतूक शुल्काच्या माध्यमातून इराण जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करू शकतो. त्यामुळे हा संघर्ष केवळ दोन देशांपुरता मर्यादित राहिलेला नसून जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षा आणि अन्नपुरवठ्यासाठी गंभीर आव्हान ठरत आहे. संवादाऐवजी संघर्षाचा मार्ग स्वीकारल्यास त्याची किंमत अखेर संपूर्ण जगालाच मोजावी लागणार आहे. युद्धातून कोणाचाही कायमस्वरूपी विजय होत नाही; मात्र त्याची किंमत संपूर्ण जगाला आर्थिक, सामाजिक आणि मानवी स्वरूपात चुकवावी लागते. होर्मुझमधील वाढता संघर्ष जागतिक व्यापार साखळी, ऊर्जा सुरक्षा आणि अन्नपुरवठ्यासाठी दीर्घकालीन धोका ठरत आहे.

## प्रासंगिक »

### मन करा रे प्रसन्न!

**विश्वनाथरावांना तीन मुलगे, तर त्यांचे भाऊ जयंतरावांना तीन मुली होत्या. मुलींच्या लग्नाचा खर्च करावा लागतो, म्हणून तीन मुलगे असल्याचा विश्वनाथरावांना मोठा अभिमान होता.**

ते नेहमी आपल्या नशिबाची स्तुती करत असत. काळ पुढे सरकत गेला. मुलगे मोठे झाल्यावर ते आपल्या संसारात रमले आणि वडिलांकडे दुर्लक्ष करू लागले. त्यामुळे विश्वनाथराव एकाकी झाले.

दुसरीकडे, जयंतरावांनी कधीही मुली असल्याचे दुःख मानले नाही. "परमेश्वर सर्वांची काळजी घेतो," या विश्वासाने त्यांनी पत्नीसमवेत कष्ट करून मुलींना चांगले संस्कार दिले आणि त्यांचे संसारही सुखाचे झाले. मुली सतत आई-वडिलांची विचारपूस करत राहिल्या. त्यामुळे जयंतरावांचे घर नेहमी आनंदी आणि समाधानाने भरलेले राहिले.

- तात्पर्य : **खरे सुख संपत्तीत किंवा मुलगा-मुलगी यांत नसते; ते प्रसन्न, समाधानी आणि अहंकारमुक्त मनात असते. अहंकार माणसाला दुःखाकडे नेतो, तर सकारात्मक विचार आणि समाधान जीवन आनंदी बनवतात.**

यंदाच्या फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेने पुन्हा एकदा फुटबॉल हा खऱ्या अर्थाने जागतिक खेळ असल्याचे सिद्ध केले आहे. उपांत्य फेरीत अर्जेंटिना आणि स्पेन यांनी प्रभावी विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

# अनुभव विरुद्ध वेग : विश्वविजेतेपदाचा महासंग्राम!




आता विश्वविजेतेपदाच्या या महासंग्रामाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. ही केवळ दोन संघांतील लढत नसून अनुभव विरुद्ध वेग, परंपरा विरुद्ध आधुनिकता आणि संयम विरुद्ध आक्रमकता असा रोमांचकारी संघर्ष ठरणार आहे.

गतविजेता अर्जेंटिनाने उपांत्य फेरीत इंग्लंडसारख्या बलाढ्य संघाला पराभूत करत अंतिम फेरी गाठली. दुसरीकडे, स्पेनने फ्रान्सवर मात करून आपल्या नव्या पिढीच्या वेगवान आणि तांत्रिक फुटबॉलची ताकद दाखवून दिली. संपूर्ण स्पर्धेत दोन्ही संघांनी सातत्यपूर्ण आणि दर्जेदार कामगिरी केल्यामुळे अंतिम सामना अत्यंत अटीतटीचा होण्याची चिन्हे आहेत.

अर्जेंटिनाचा सर्वात मोठा आधार म्हणजे लिओनेल मेस्सी. अनुभव, अचूक पासिंग, चेंडूवरील नियंत्रण आणि निर्णायक क्षणी सामना फिरवण्याची त्याची क्षमता आजही तितकीच प्रभावी आहे. मेस्सी हा केवळ गोल करणारा खेळाडू नसून संपूर्ण संघाच्या खेळाचा केंद्रबिंदू आहे. त्याचबरोबर अर्जेंटिनाची शिस्तबद्ध बचावफळी, मधल्या फळीतील नियंत्रण आणि संधीचे गोलमध्ये रूपांतर करण्याची क्षमता हेही त्यांच्या यशाचे महत्त्वाचे घटक आहेत.

स्पेनचा खेळ मात्र वेग, सातत्यपूर्ण पासिंग आणि तांत्रिक कौशल्यावर आधारित आहे. लॅमिन यामालसारखा युवा खेळाडू त्यांच्या आक्रमणाचा चेहरा बनला आहे. त्याचा वेग आणि ड्रिबलिंग प्रतिस्पर्धी बचावफळीला सतत अडचणीत टाकू शकते. स्पेनची मधली फळी चेंडूवर नियंत्रण ठेवून प्रतिस्पर्ध्यावर दबाव निर्माण करण्यात तरबेज आहे. मात्र, संधीचे गोलमध्ये रूपांतर करण्यात होणारा विलंब आणि मोठ्या सामन्याचा दबाव ही त्यांची कमकुवत बाजू ठरू शकते.

अंतिम सामन्यात माईंड गेमही तितकाच महत्त्वाचा ठरणार आहे. या बाबतीत अर्जेंटिनाच्या अनुभवी खेळाडूंना निश्चितच आघाडी मिळू शकते. दुसरीकडे, स्पेनचा आक्रमक वेग आणि युवा जोश अर्जेंटिनाच्या बचावफळीची कठोर परीक्षा पाहणार आहे. त्यामुळे सामन्याचा निकाल मधल्या फळीतील वर्चस्व, बचावातील शिस्त आणि मिळालेल्या संधींचा अचूक फायदा कोण घेतो, यावर अवलंबून राहील. अर्जेंटिनाला चौथ्या विश्वविजेतेपदाची संधी आहे, तर स्पेन दुसऱ्यांदा जगज्जेते होण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



देवाच्या प्रसादें करा रे भोजन ।
व्हाल कोण कोण अधिकारी ते ॥१॥

ब्रम्हादिकांसि हें दुर्लभ उच्छिष्ट ।
नका मानूं वीट ब्रम्हरसीं ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# धर्मेंद्र प्रधान यांना सोनं लागलंय का?

## वांगचुक यांना बळजबरीने उचलल्यानंतर उद्धव ठाकरेंची संतप्त प्रतिक्रिया

**महाईन्यूज । मुंबई**

**नीट पेपर फुटीप्रकरणात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यात यावा, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर उपोषणाला बसले होते. आज त्यांचा उपोषणाचा २१ दिवस होता. मात्र पोलिसांनी त्यांना बळजबरीने तिथून उचलून सफदरजंग रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्यासह काही तरुणांना पोलिसांकडून मारहाण झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.**



या प्रकरणी आता राज्यातील नेते प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. शिवसेनेचे (ठाकरे) नेते उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून धर्मेंद्र प्रधान यांना वाचविण्यामागे कारण काय? असा प्रश्न उपस्थित केला. राम मंदिरातील देणगी अपहार प्रकरणी रामरक्षा आंदोलनासाठी उद्धव ठाकरे नागपूरमध्ये आलो होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीविषयी सरकारला काळजी असेल तर त्यांनी यापूर्वीच त्यांच्याशी संवाद साधायला हवा होता. सरकारने नीटची परीक्षा व्यवस्थित घेतली नाही. आता ते आंदोलनही नीट हाताळू शकत नाही. म्हणूनच मी म्हणतो की, भाजपा आणि प्रशासन यांचा दुरान्वये संबंध नाही.

दिल्ली न्यायालयाने सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवण्याचे आदेश दिले होते. मात्र पोलिसांनी न्यायालयाचे कारण पुढे करून वांगचुक यांना उचलून नेले. यावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, पोलिसांनी न्यायालयाची ऑर्डर दाखवावी. न्यायालयाने कुठेही असे म्हटले नव्हते. न्यायालयाने प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली होती. आपल्या देशात स्वातंत्र्यापूर्वी आणि आता काही उपोषणे झाली होती. तेव्हा सरकारने चर्चा करूनच उपोषणे सोडली होती.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी अण्णा हजारेंच्या उपोषणाचा संदर्भ दिला. काँग्रेस सरकारने त्यांच्याशी चर्चा करून उपोषण सोडवले होते. आपले म्हणणे रेटून नेणे म्हणजे सरकार चालवणे होत नाही, अशी टीका उद्धव ठाकरे म्हणाले. मनसेचे नेते अमित ठाकरे यांनीही आज जंतर-मंतरवर जाऊन आंदोलकांची भेट घेतली. मात्र त्याआधीच सोनम वांगचुक यांना बळजबरीने नेल्याचे समजल्यावर त्यांनी सरकारवर टीका केली. साध्या वेषात आलेल्या पोलिसांनी स्वतःला डॉक्टर असल्याचे भासवून सोनम वांगचुक यांना उचलून आले. पोलीस सफेद कापड घेऊन आले होते. ते आंदोलकांसमोर धरून उचलून नेण्यात आले. ही दडपशाही असून लोकशाहीसाठी घातक आहे. दरम्यान, सोनम वांगचुक यांना ताब्यात घेतल्याच्या घटनेनंतर देशभरातून विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या प्रकरणामुळे केंद्र सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, येत्या काही दिवसांत हा वाद आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### धर्मेंद्र प्रधान यांच्यावर टीका

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, “धर्मेंद्र प्रधान यांच्यात असे काय आहे. ज्यामुळे केंद्र सरकार त्यांना वाचवत आहे. अजून किती बळी गेल्यानंतर सरकार धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला जाणार आहे, हे सरकारने एकदा जाहीर करावे. सोनम वांगचुक हे तर आपल्या प्राणांची आहुती देण्यास तयार आहेत. तसेच आता काही तरूणही उपोषणाला बसले आहेत. नीट पेपरफुटीप्रकरणी अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. आपल्या देशाची युवा शक्ती अशी वाया जात असताना धर्मेंद्र प्रधान यांना असे काय सोने लागले आहे की, त्यांच्या चुकावर सरकार पांघरून घालत आहे.”

## राज्यात अवैध दारूचा महापूर; सव्वा तीन वर्षांतच लाखाहून अधिक गुन्हे

**महाईन्यूज । मुंबई**

**गेल्या सव्वा तीन वर्षात राज्यभरात अवैध दारू विक्री व तस्करीचे लाखावर गुन्हे दाखल झाले आहेत. तर, या कारवायांमध्ये २८९ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणावर कारवाई करूनही महाराष्ट्रातील अवैध दारूचे जाळे मोडीत निघण्याऐवजी अधिकच विस्तारत असल्याचे वास्तव आहे.**



कारवाईनंतर काही कालावधीतच परत नेटवर्क उभे राहत असल्याने राज्यातील अवैध मद्यव्यवसायाची मुळे किती खोलवर रुजली आहेत, असा सवाल उपस्थित होत आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आकडेवारीनुसार, अवैध दारूची निर्मिती, वाहतूक, साठवण आणि विक्रीविरोधात दरवर्षी हजारो कारवाया होतात. केवळ गावठी दारूच नव्हे, तर बनावट विदेशी मद्य, तस्करीतून आणलेली दारू, बेकायदा मद्यनिर्मितीसाठी वापरले जाणारी रसायने, स्पिरिट आणि मिथेनॉल यांच्याविरोधातही मोठ्या प्रमाणावर गुन्हे नोंदविले जात आहेत. मार्च २०२३ ते जून २०२६ या सव्वा तीन वर्षाच्या कालावधीत एक लाख ४८ गुन्हे दाखल करण्यात आले. यात ७२ हजार ६२० आरोपींना अटक करण्यात आली.

उत्पादन शुल्क विभागाने जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमतही वर्षागणिक वाढत आहे. यावरून अवैध मद्यव्यवसायाची उलाढाल आणि आर्थिक व्याप्ती किती मोठी आहे, याची कल्पना येते. २०२३-२४ मध्ये ६९ कोटींचा मुद्देमाल जप्त केला होता. तर, मागील आर्थिक वर्षात हा आकडा १०२ कोटींवर गेला. हजारो लिटर गावठी दारू, विदेशी मद्याच्या बनावट बाटल्या, रसायने, वाहने, उत्पादन साहित्य आणि मद्यनिर्मितीची यंत्रणा कारवायांमध्ये जप्त करण्यात आली आहे.

### ५७ भरारी पथके, तरीही अवैध धंदे सुरूच

राज्यात अवैध मद्यनिर्मिती आणि तस्करी रोखण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाच्या १६४ क्षेत्रीय कार्यकारी घटकांमार्फत नियमित तपासण्या केल्या जातात. याशिवाय ५७ भरारी पथके आणि २७सीमातपासणी नाके दिवस-रात्र कार्यरत आहेत. राज्याच्या सीमांवरून होणारी दारूची तस्करी रोखणे, गावठी दारूचे अड्डे उद्ध्वस्त करणे आणि बनावट मद्यनिर्मितीवर कारवाई करणे ही या यंत्रणांची जबाबदारी आहे. तरीही अवैध मद्यनिर्मिती पूर्णपणे थांबलेली नाही.

# आता युद्ध सैनिकांचे नव्हे, तर AI चे?

## रशिया-युक्रेनच्या युद्धातील मिळालेल्या धड्यांमुळे जगभरातील संरक्षण तज्ज्ञ चिंतेत

**महाईन्यूज । जॉर्डन**

**“ज्याच्याकडे सर्वाधिक सैनिक असतात तो नव्हे; तर ज्याच्याकडे सर्वाधिक वेगाने निर्णय घेणारी यंत्रणा, तोच जिंकण्याची सर्वाधिक शक्यता” हे आधुनिक युद्धाचे नवे सूत्र ठरते आहे. युक्रेनचे आकाशात उडणारे एक छोटेसे ड्रोन अचानक दिशा बदलते, शत्रूचा रणगाडा ओळखते आणि मानवीच्या आदेशाशिवाय क्षणार्धात तो जमीनदोस्त करते.**



युक्रेनच्या ड्रोनने केलेला हल्ला हा मानवी आदेशाशिवाय झालेला असतो. ड्रोनच्या कॅमेऱ्याला जमिनीवर एक रणगाडा नजरेस पडलेला असतो आणि तो शत्रूचा आहे, हेही लक्षात आलेले असते. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) त्या रणगाड्याचा आकार, त्यातून येणाऱ्या उष्णतेची प्रतिमा आणि हालचाल यांचा क्षणात अभ्यास करते आणि इलेक्ट्रॉनिक जॅमिंगमुळे GPS बंद पडलेले असतानाही ते ड्रोन पुढच्या काही सेकंदांतच हल्ला करून रणगाडा जमीनदोस्त करते... ही रशिया- युक्रेन युद्धात प्रत्यक्ष घडलेली घटना आहे.

रशिया-युक्रेन युद्धाने जगाला दाखवून दिले आहे की, भविष्यातील युद्धे केवळ रणगाडे, क्षेपणास्त्रे किंवा लढाऊ विमाने यांच्या बळावर लढली जाणार नाहीत. तर माहितीचे विश्लेषण, अल्गोरिदम, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वायत्त ड्रोन यंत्रणा, उपग्रह आणि डिजिटल नेटवर्क ही युद्धातील निर्णायक शस्त्रे असतील. त्यामुळेच युद्धभूमीवर आता तोफगोळ्यांपेक्षा डेटाचा वेग अधिक महत्त्वाचा ठरतो आहे, असे जगभरातील संरक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

रशिया- युक्रेन युद्धाच्या सुरुवातीला जगाचे लक्ष रणगाडे आणि क्षेपणास्त्रांकडे होते. पण नंतरच्या दोन -तीन वर्षांत या युद्धाचे चित्र बदलले. सध्या हजारो ड्रोन्स एकाच वेळेस उड्डाण करत असतात. हे ड्रोन केवळ हल्ला करत नाहीत, तर शत्रूची माहिती गोळा करतात, तोफखान्यासाठी लक्ष्यनिश्चिती करतात, आणि प्रसंगी जखमी सैनिकांपर्यंत औषधेही पोहोचवतात. युक्रेनने AI च्या मदतीने ड्रोनची लक्ष्य निश्चित करण्याची क्षमता वाढवत नेली आहे. दुसरीकडे रशियाने इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणालींचा वापर करून ड्रोन्स निष्क्रिय करण्याचा प्रयत्न केला. परिणामी दोन्ही बाजूंनी ‘AI विरुद्ध AI’ अशी नवी स्पर्धा सुरू झाली. यामुळेच जगभरात सामरिक तज्ज्ञांच्या लक्षात आलेला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे युद्ध आता शस्त्रांचे कमी आणि सॉफ्टवेअरचे अधिक झाले आहे. युद्धातील प्रत्येक सेकंद आता अधिक महत्त्वाचा आहे. उदाहरणार्थ, उपग्रहाच्या माध्यमातून तासात ५० हजार छायाचित्रे आली. त्यातील कोणत्या छायाचित्रात शत्रूची हालचाल आहे हे माणसाला शोधण्यासाठी काही तास लागतील. पण AI काही सेकंदांत रणगाडे ओळखतं, सैनिकांची हालचाल शोधतं, नवीन बंकर तयार झाला आहे का या शोध घेतं आणि संभाव्य हल्ल्याचा अंदाजही व्यक्त करतं. यामुळे कमांडिंग अधिकाऱ्याला अधिक वेगाने निर्णय घेता येतो.

### ड्रोन युद्धाचा नवा अध्याय

एकेकाळी ड्रोन म्हणजे फक्त निरीक्षण करणारे मानवरहीत विमान असे मानले जात होते. आज परिस्थिती पूर्ण बदलली आहे. FPV (FIRST PERSON VIEW) ड्रोन अवघ्या काही लाखांमध्ये तयार होतात. पण काही कोटी किमतीचे रणगाडे नष्ट करण्याची क्षमता राखतात. युक्रेनने या स्वस्त ड्रोनचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. रशियानेही त्याला उत्तर म्हणून AI-आधारित ड्रोन विकसित करण्यास सुरुवात केली. यामुळे युद्धाचे अर्थशास्त्रच बदलून गेले आहे. महागड्या शस्त्रांच्या विरोधात स्वस्त आणि बुद्धिमान ड्रोन हेच आजच्या लढाईतील वास्तव असल्याचे रशिया- युक्रेन युद्धाने दाखवू दिले आहे.

---

# सोनम वांगचुक यांच्या उपोषणावर राहुल गांधींची पहिलीच प्रतिक्रिया

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीत चाललेल्या आंदोलनप्रकरणी अखेर खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. सोनम वांगचुक यांना अटक केल्यानंतर त्यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. सोनम वांगचुक यांना अटक करणं ही सरकारची चूक असल्याचं त्यांनी म्हटलंय.**




“मोदी सरकारच्या मुख्य तत्त्वांमध्ये असत्य आणि हिंसा यांचा समावेश आहे. सोनम वांगचुक शांततापूर्ण उपोषणावर असताना त्यांना जंतरमंतरवरून हटवणं चुकीचं आहे”, असं राहुल गांधी म्हणाले.

“पेपर लीक, शिक्षणाचा वाढता खर्च आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्या या भारताच्या भविष्यासाठी अत्यंत गंभीर समस्या आहेत. कोणत्याही प्रकारची बळजबरी भारताच्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या व विश्वास ठेवणाऱ्या आम्हा सर्वांना हे मुद्दे मांडण्यापासून रोखू शकत नाही”, असंही राहुल गांधी म्हणाले.

दरम्यान, या काळात कॉकरोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दिपके त्यांच्या मित्राकडे फ्रेश होण्याकरता गेले होते. त्यांना याबाबत कळलं तेव्हा त्यांनी लागलीच जंतर-मंतरकडे धाव घेतली. मात्र, तिथे जाण्यापासून रोखण्यात येत असल्याचं सांगत आंदोलनकर्त्यांवर लाठीचार्ज केल्याचा दावा अभिजीत दिपकेंनी केला. सध्या अभिजीत दिपकेही उपोषणाला बसले असून सोनम वांगचुक यांनीही रुग्णालयातून उपोषण सुरू ठेवणार असल्याचं समोर आलं आहे. दरम्यानच्या काळात अभिजीत दिपके यांच्यावर शाहीफेकही झाली. या प्रकरणामुळे देशभरातील विद्यार्थी संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध राजकीय पक्षांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. जंतर-मंतरवरील कारवाईबाबत केंद्र सरकारवर विरोधकांनी लोकशाही मूल्यांचा अवमान केल्याचा आरोप करत निषेध व्यक्त केला आहे. दुसरीकडे, प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती कारवाई केल्याचे स्पष्टीकरण दिल्याची माहिती समोर येत आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून परिस्थितीवर प्रशासनाकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

### दिवसभर जंतर-मंतर येथे काय झालं?

दिल्लीतील जंतर-मंतर येथे २८ जूनपासून सोनम वांगचुक बेमुदत उपोषणाला बसले होते. तर, २० जुलै रोजी त्यांनी संसदेवर मोर्चाचे आयोजन केले होते. मात्र, त्याआधीच दिल्ली पोलिसांनी सोनम वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून उचलून सफदरगंज रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. दोन दिवसांपूर्वी दिल्ली उच्च न्यायालयाने सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीविषयी चिंता व्यक्त करून त्यांना केंद्र सरकराने वैद्यकीय सहाय्य करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, संबंधित कार्यवाही केली असल्याचं दिल्ली पोलिसांनी म्हटलं आहे. सकाळी साडेसहा वाजताच साध्या वेशातील काही पोलीस आणि वैद्यकीय पथक आंदोलनस्थळी पोहोचले. व्यासपीठावर पोहताच त्यांनी उपचार करायचे असल्याचे सांगत पांढरे पडदे लावले. उपचारानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करणं आवश्यक असल्याचं सांगत त्यांना गर्दीतून वाट काढत रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

# रश्मिकाच्या यशामागची वेदना

नॅशनल क्रश रश्मिका मंदाना देशातील मोठ्या अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. ती खऱ्या अर्थाने पॅन इंडियन स्टार आहे. 'पुष्पा,' 'ॲनिमल' आणि 'छावा' यांसारख्या चित्रपटांमुळे तिने देशभरात प्रसिद्धी मिळवली आहे. पण करिअरच्या सुरुवातीला तिला सतत नकारांचा सामना करावा लागला. रश्मिकाने करिअरच्या सुरुवातीच्या दिवसांत २० ते २५ ऑडिशन्स दिल्या. बहुतेक ठिकाणी चेहरा अभिनेत्रीसारखा नाही असे सांगून तिला नाकारण्यात आले. ती घरी परतल्यावर रडायची. एका चित्रपटासाठी दोन-तीन महिने प्रशिक्षण घेतल्यानंतर तो चित्रपटही बंद पडला. तरीही तिने हार मानली नाही आणि पहिल्याच कन्नड चित्रपट 'किरिक पार्टी'मधून ती स्टार बनली. रश्मिकाने एका मुलाखतीत करिअरच्या प्रारंभी आलेल्या अडचणींचा उल्लेख केला. अनेक



कास्टिंग टीम्सनी तिला सांगितले की तिचा चेहरा अभिनेत्रीसारखा दिसत नाही. या गोष्टीमुळे तिला आतून खूप दुःख व्हायचे. सततच्या नकारांनंतर ती अनेकदा घरी परतल्यावर रडायची. त्यावेळी तिला अपयश स्वीकारता येत नव्हते. प्रत्येक नकारामुळे तिला वाटायचे की, कदाचित ती या उद्योगासाठी बनलेलीच नाही. यादरम्यान तिला कसाबसा पहिला चित्रपट मिळाला. मात्र, तो मध्येच बंद पडला. याबद्दल सांगताना रश्मिका म्हणते, "त्या. चित्रपटाचे नाव 'गालारे गेलातीरे' होते. आम्ही दोन-तीन महिने त्याचे प्रशिक्षणही घेतले, पण दुर्दैवाने तो चित्रपट कधी सुरूच होऊ शकला नाही. मी घरी परत आले आणि माझ्या अभ्यासात रमून गेले. त्यावेळी माझ्या आई-वडिलांनीही सांगितले की, आता दोन वर्षे झाली आहेत, घरी परत ये. मीही विचार केला की कदाचित माझ्या आयुष्याचा मार्ग हाच आहे."



# बिश्नोई गँगचा आमिर खानला इशारा

बॉलिवूड अभिनेता आमिर खानला लॉरेन्स बिश्नोई गँगकडून धमकी मिळाली आहे. लॉरेन्स बिश्नोई गटाचे सदस्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अर्जू बिश्नोई आणि टायसन बिश्नोई यांनी कथितरित्या शेअर केलेली एक पोस्ट आणि ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर समोर आली आहे. त्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, आमिर खानसारखे लोक आपल्या देशात लव्ह जिहादला प्रोत्साहन देत आहेत. हे आपल्या संस्कृतीच्या विरोधात आहे. आम्ही या माणसाला सहन करणार नाही आणि त्याला लवकरच त्याचे परिणाम भोगावे लागतील. हे सनातन धर्म आणि देशाच्या विरोधात आहे. मात्र, मुंबई पोलिसांना अद्याप आमिर खान किंवा त्याच्या टीमकडून कोणतीही तक्रार मिळालेली नाही. फेसबुक आणि एका व्हॉइस नोटद्वारे आलेल्या कथित धमकीबद्दल पोलिसांना माध्यमांकडून माहिती मिळाली आहे. त्याची ते पडताळणी करत आहेत. आमिर खानकडून तक्रार आल्यास गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. दरम्यान, काळवीट शिकार प्रकरणावरून लॉरेन्स बिश्नोई यांचा सलमान खानसोबत वाद सुरू आहे. दरम्यान, बिश्नोई टोळीकडून आमिर खानला पहिल्यांदाच धमकी देण्यात आली आहे. ऑडिओ क्लिप्समध्ये म्हटले आहे, 'आम्ही आमच्या बंधू-भगिनींना आणि देशवासियांना वचन देतो की, अशा लज्जास्पद कृत्यांना प्रोत्साहन देणाऱ्या कोणालाही आम्ही आमच्या पद्धतीने धडा शिकवू. स्टारडमच्या नावाखाली जे याचा प्रचार करतात, त्यांचा आम्ही गळा दाबू.'

# रसिकाचा मोहक अंदाज

अभिनेत्री रसिका सुनीलने आपल्या बोल्ड आणि ग्लॅमरस लूकने सोशल मीडियावर पुन्हा एकदा धुमाकूळ घातला आहे. रसिकाने नुकतेच हिरव्या रंगाच्या पारंपरिक साडीतील काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोंमध्ये तिचा साधा, मोहक अंदाज चाहत्यांना विशेष भावला. पारंपरिक वेशभूषेला आधुनिक स्टाईलची जोड देत तिने पुन्हा एकदा फॅशनप्रेमींचं लक्ष वेधून घेतलं आहे. या फोटोंमध्ये रसिकाने हिरव्या रंगाची साडी आणि त्यावर चॉकलेटी रंगाचा ब्लाउज परिधान केला आहे. मोकळे केस, हलका मेकअप आणि तिची किलर पोझ यामुळे अनेकांकडून तिच्या फोटोवर लाइक आणि कमेंटचा वर्षाव होत आहे. रसिका सुनीलने आपल्या पारंपरिक लूकला अधिक आकर्षक बनवण्यासाठी ऑक्सिडाइज्ड झुमक्यांची निवड केली होती. हिरव्या साडी आणि ब्राऊन ब्लाऊजसोबत हे झुमके अतिशय सुंदर खुलून दिसत होते. कोणतेही जड दागिने न घालता केवळ स्टेटमेंट झुमक्यांमुळे तिच्या संपूर्ण लूकला एलिगंट आणि मराठमोळा टच मिळाला. कमीत कमी ॲक्सेसरीज वापरूनही तिचा लूक अतिशय क्लासी आणि रॉयल दिसत होता. अनेकांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.



# लॉर्ड्सवर ‘करो या मरो’ लढत!

## भारताविरुद्धच्या निर्णायक सामन्याआधी इंग्लंडचा मोठा निर्णय

**महाईन्यूज । लंडन**

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरु आहे. या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाने दमदार विजयाची नोंद केली होती. त्यानंतर झालेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात इंग्लंडने पुनरागमन केलं आणि दमदार विजय मिळवला. कार्डिफच्या मैदानावर मिळवलेल्या विजयासह इंग्लंडने ही मालिका १-१ ने बरोबरीत आणली आहे. त्यामुळे मालिकेतील तिसरा सामना हा दोन्ही संघांसाठी अतिशय महत्वाचा असणार आहे. मालिकेतील तिसरा सामना १९ जुलैला लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर खेळवला जाणार आहे. या निर्णायक सामन्याआधी इंग्लंडने आपल्या संघात मोठा बदल केला आहे.**




या ३ वनडे सामन्यांच्या मालिकेसाठी इंग्लंडने लियाम डॉसन आणि टॉम बँटनला संघात स्थान दिलं होतं. डॉसनला मालिकेतील पहिला सामना खेळण्याची संधी मिळाली होती. या सामन्यात त्याने फलंदाजीत दमदार कामगिरी करुन ६८ धावांची खेळी केली होती. यादरम्यान त्याने जो रुटसोबत मिळून १२१ धावांची भागीदारी केली होती. पण या सामन्यात भारतीय संघाने बाजी मारली होती. त्यानंतर या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात त्याला विश्रांती दिली गेली होती. तर दुसरीकडे टॉम बँटनला मालिकेतील दोन्ही सामने खेळण्याची संधी मिळाली नव्हती. आता दोन्ही खेळाडूंना इंग्लंडच्या मुख्य संघातून बाहेर करण्यात आलं आहे.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा वनडे सामना १९ जुलैला खेळवला जाणार आहे. त्याआधी १८ जुलैला टी-२० ब्लास्ट स्पर्धेतील सेमी फायनलचे सामने खेळवले जाणार आहेत. स्पर्धेतील पहिल्या सेमी फायनलचा सामना नॉर्थम्प्टनशायर आणि स्टीलबॅक्स या दोन्ही संघांमध्ये खेळवला जाणार आहे. तर दुसऱ्या सेमी फायनलमध्ये हॅम्पशायर हॉक्स आणि नॉट्स आऊटलॉज या दोन्ही संघांमध्ये खेळवला जाणार आहे. हे दोन्ही खेळाडू टी-२० ब्लास्ट स्पर्धेत खेळताना दिसून येणार आहेत.

### भारतीय संघाच्या प्लेईंग ११ मध्ये बदल होणार?

या निर्णायक सामन्यात भारतीय संघाच्या प्लेईंग ११ मध्येही बदल पाहायला मिळू शकतो. मालिकेतील दुसऱ्या सामन्यादरम्यान वॉशिंग्टन सुंदर दुखापतग्रस्त झाला होता. त्यामुळे तो तिसऱ्या वनडे सामन्यातून बाहेर झाला आहे. त्यामुळे या महत्वाच्या सामन्यात वॉशिंग्टन सुंदरच्या जागी कोणाला संधी मिळणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. या महत्वाच्या सामन्यासाठी सुंदरच्या जागी कुलदीप यादवचा प्लेईंग ११ मध्ये समावेश केला जाऊ शकतो.

# फिफा फायनलमध्ये लिओनेल मेस्सी घडवणार इतिहास!

**महाईन्यूज । अर्जेंटिना**

**फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील फायनलचा सामना अर्जेंटिना आणि स्पेन या दोन्ही बलाढ्य संघांमध्ये खेळवला जाणार आहे. संपूर्ण फुटबॉलविश्व या सामन्याची आतुरतेने वाट पाहत आहे. कारण अर्जेंटिनाकडे सलग दुसऱ्यांदा फिफा वर्ल्डकपची ट्रॉफी उंचावण्याची संधी असणार आहे. तर लामिन यमालचा स्पेनचा संघ अर्जेंटिनाला जेतेपदापासून रोखण्यासाठी पूर्ण जोर लावताना दिसून येणार आहे. अर्जेंटिना स्टार खेळाडू लिओनेल मेस्सीने या संपूर्ण स्पर्धेत दमदार कामगिरी केली आहे. दरम्यान फायनलमध्ये मेस्सीला ३ मोठे रेकॉर्ड मोडून काढण्याची संधी असणार आहे.**

याआधी २०२२ मध्ये झालेल्या फिफा वर्ल्डकपमध्ये अर्जेंटिनाने फ्रान्सला पराभूत करुन जेतेपदाचा मान पटकावला होता. आता अर्जेंटिनाकडे सलग दुसऱ्यांदा फिफा वर्ल्डकप जिंकण्याची संधी असणार आहे.२०२२ मध्ये मेस्सी अर्जेंटिनाचा कर्णधार होता. यावेळीही मेस्सी अर्जेंटिनाचा कर्णधार आहे. हा वर्ल्डकप जिंकताच तो कर्णधार म्हणून सलग २ वर्ल्डकप जिंकणारा पहिलाच कर्णधार बनू शकतो.

याआधी २००२ मध्ये झालेल्या फिफा वर्ल्डकप स्पर्धेत ब्राझीलच्या रोनाल्डो नजारियोने एकाच वर्ल्डकप स्पर्धेत सर्वाधिक ८ गोल केले होते. २०२६ फिफा वर्ल्डकप स्पर्धेत मेस्सीनेही ८ गोल केले आहेत. जर फायनलमध्ये एकही गोल केला, तर तो वर्ल्डकप जिंकणाऱ्या संघाकडून सर्वाधिक गोल करणारा खेळाडू बनू शकतो. मेस्सी गोल्डन बूटच्या शर्यतीतही आघाडीवर आहे. गेल्या वर्ल्डकप स्पर्धेत गोल्डन बूटची संधी थोडक्यात हुकली होती. पण यावेळी तो गोल्डन बूटचा पुरस्कार जिंकू शकतो. यासह ३ वेळा हा पुरस्कार जिंकणारा तो पहिलाच खेळाडू बनू शकतो.

याआधी इटली आणि ब्राझील या दोन्ही संघांनी लागोपाठ २ वेळा फिफा वर्ल्डकप जिंकण्याचा मान पटकावला आहे. जर अर्जेंटिनाने स्पेनला हरवून जेतेपदाचा मान पटकावला, तर मेस्सी हा वर्ल्डकप जिंकणारा सर्वात वयस्कर खेळाडू बनू शकतो. याआधी ब्राझीलच्या निल्टन सेंटॉसने १९६२ मध्ये झालेल्या वर्ल्डकपमध्ये वयाच्या ३७ व्या वर्षी आपल्या संघाला दुसरा वर्ल्डकप जिंकून दिला होता.



स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
दि. 19 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# 'बेसिल सेरिनिटी'मध्ये अनधिकृत बांधकाम?

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

चऱ्होली बुद्रुक येथील 'बेसिल सेरिनिटी' या गृहनिर्माण प्रकल्पात मंजूर आराखड्याच्या विरोधात अतिरिक्त बांधकाम करण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, संतप्त फ्लॅटधारकांनी थेट 'बेसिल डेव्हलपर्स' यांना नोटीस बजावत सात दिवसांच्या आत खुलासा करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात अपयश आल्यास महापालिका, महारेरा आणि न्यायालयीन स्तरावर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

फ्लॅटधारकांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनानुसार, 'बेसिल सेरिनिटी' प्रकल्पातील इमारतीच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर अतिरिक्त आरसीसी बांधकाम करण्यात आले आहे. मात्र, या बांधकामासाठी आवश्यक असलेली पिंपरी-चिंचवड महापालिकेची परवानगी, महारेराकडे सादर करण्यात आलेले सुधारित मंजूर आराखडे आणि इतर वैधानिक कागदपत्रे अद्याप उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, संबंधित इमारत अद्याप विकासकाच्या देखभाल मुदतीत (मेंटेनन्स पिरियड) असताना हे बांधकाम करण्यात आल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. इमारतीच्या संरचनात्मक सुरक्षिततेचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे.

## फ्लॅटधारकांच्या मागण्या

अतिरिक्त बांधकामासंदर्भातील सर्व मंजुरी व सुधारित आराखडे तात्काळ सादर करावेत. वैध परवानग्या नसल्यास संबंधित बांधकाम त्वरित थांबवावे. मंजूर आराखड्याच्या विरोधात झालेले बांधकाम हटवून मूळ स्थिती पूर्ववत करावी. नोटीस प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी स्पष्टीकरण द्यावे. विहित मुदतीत समाधानकारक उत्तर न मिळाल्यास PCMC, MAHARERA तसेच अन्य सक्षम प्राधिकरणांकडे तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशारा फ्लॅटधारकांनी दिला आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp



CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# ‘SIR’ अन् संघटनात्मक कामगिरी ठरणार निर्णायक!

## प्रभाग समितीवरील स्वीकृत सदस्यांसाठी भाजपाचे “निकष” : भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील प्रभाग समित्यांवरील स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीसाठी भारतीय जनता पक्षाने स्पष्ट निकष जाहीर केले असून, ‘स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन’ (SIR) मोहिमेतील कामगिरी आणि पक्षासाठी केलेले संघटनात्मक योगदान हेच निर्णायक ठरणार असल्याचे भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी स्पष्ट केले आहे. महापालिकेच्या विविध प्रभाग समित्यांवर एकूण ३० स्वीकृत सदस्यांची नियुक्ती दि. २७ ते ३० जुलै २०२६ या कालावधीत होण्याची शक्यता असून, त्यासाठी पक्षांतर्गत प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे.**



यासंदर्भात शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी सांगितले की, प्रभाग समितीवरील स्वीकृत सदस्य म्हणून काम करण्यास इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांनी दि. १८ जुलै २०२६ रोजी भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात लिखित अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये पूर्ण नाव, मोबाईल क्रमांक, प्रभाग क्रमांक, पक्षातील कार्याचा कालावधी, शैक्षणिक पात्रता, संपूर्ण रहिवासी पत्ता आदी माहिती नमूद करणे बंधनकारक राहणार आहे.

विशेष म्हणजे, इच्छुक कार्यकर्त्यांनी दि. २५ जुलै २०२६ पर्यंत आपल्या प्रभागातील किमान १५ बूथवर ८० टक्क्यांपेक्षा अधिक SIR मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण करणे अनिवार्य केले आहे. तसेच, संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या भाजपा सरचिटणीसांकडून ‘Task Letter Completion’ प्राप्त करून ते विहित मुदतीत पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात जमा करणे बंधनकारक असेल.

चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी भाजपा संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, भोसरीसाठी विकास डोळस आणि पिंपरीसाठी वैशाली खाडये यांच्याकडून जारी केलेले ‘Task Letter Completion’च ग्राह्य धरण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाच्या संघटनात्मक विस्तारासाठी कार्यरत असलेल्या पदाधिकारी, बूथप्रमुख आणि सक्रिय कार्यकर्त्यांना आगामी काळात मोठी संधी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेषतः मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले जाणार असल्याने, शहरातील राजकीय वर्तुळात या नियुक्त्यांबाबत उत्सुकता वाढली आहे.

याबाबत शत्रुघ्न काटे म्हणाले की, “भाजपा हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. पक्षासाठी सातत्याने काम करणाऱ्या आणि संघटन मजबूत करण्यासाठी योगदान देणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याची दखल घेतली जाते. निर्धारित मुदतीत SIR मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण करून संबंधित सरचिटणीसांचे ‘ऑफिशियल टास्क कन्फर्मेशन लेटर’ सादर करणाऱ्या इच्छुक कार्यकर्त्यांच्याच नावाची शिफारस मी, शहराध्यक्ष या नात्याने, भाजपच्या कोअर कमिटीकडे प्रभाग समितीवरील स्वीकृत सदस्य म्हणून करणार आहे.” निर्धारित निकषांनुसार SIR मोहीम पूर्ण न करणाऱ्या किंवा आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर न करणाऱ्या कोणत्याही उमेदवाराच्या नावाची शिफारस करण्यात येणार नाही. त्यामुळे स्वीकृत सदस्यपदासाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांनी ही प्रक्रिया गांभीर्याने घेणे आवश्यक आहे.

दरम्यान, आगामी महापालिका निवडणुका लक्षात घेता भाजपाने पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तिन्ही विधानसभा मतदारसंघांमध्ये बूथस्तरावरील मजबुतीकरण, मतदार यादी पुनरीक्षण आणि नवमतदार नोंदणीवर विशेष भर दिला आहे. त्यामुळे प्रभाग समितीवरील स्वीकृत सदस्यांच्या नियुक्त्या या केवळ राजकीय समतोलासाठी नव्हे, तर आगामी निवडणुकांसाठी सक्षम संघटन उभारण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.



“ देशातील अनेक राज्यांमध्ये अतिवृष्टीमुळे मतदारांना SIR प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी अतिरिक्त वेळ देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचे कार्यकर्ते बूथस्तरावर सक्रियपणे काम करत आहेत. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी आणि मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रभाग समितीवरील स्वीकृत सदस्य नियुक्त्यांमध्ये निश्चितच प्राधान्य देण्यात येईल. भाजपामध्ये मेहनत, पक्षनिष्ठा आणि जनसंपर्क यांनाच खरे महत्त्व आहे.

**- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

### अतिवृष्टीमुळे SIR मोहिमेला मुदतवाढ

अतिवृष्टीमुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने ‘स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन’ (SIR) प्रक्रियेला १० दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार, गृहभेटींची प्रक्रिया आता दि. ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. मतदार यादीचे प्रारूप दि. १७ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार असून, दावा-हरकती स्वीकारण्याचा कालावधी १७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर असा असेल. दावा-हरकतींची छानणी १६ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबरदरम्यान होणार असून, अंतिम मतदार यादी दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यामुळे पुढील दोन महिने बूथस्तरावरील कार्यकर्त्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत.

# डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलाचा प्लेसमेंटमध्ये दबदबा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्यविकास आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाच्या बळावर डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुल, आकुर्डीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्लेसमेंटच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड होत असून, यंदा विद्यार्थ्यांना सरासरी ६ ते १५ लाख रुपयांपर्यंत वार्षिक पॅकेज मिळाले आहे.**



संकुलातील इंजिनिअरिंग, फार्मसी, एमबीए, एमसीए, पीजीडीएम तसेच पॉलिटेक्निक विभागातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. विशेषतः सायबर सिक्युरिटी, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि डेटा ॲनालिटिक्स यांसारख्या कौशल्याधारित क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे. गतवर्षी संकुलातील विद्यार्थ्यांनी तब्बल २७ लाख रुपये वार्षिक (LPA) चे सर्वोच्च पॅकेज मिळवत नवा विक्रम प्रस्थापित केला होता. त्या यशाची परंपरा यंदाही कायम राखण्यात संकुलाला यश आले आहे.

व्होडाफोन, दीपक फर्टिलायझर्स, बीएनवाय मेलॉन, कॅपजेमिनी, फोर्स मोटर्स, विप्रो, डसॉल्ट सिस्टिम्स, गोदरेज, सुल्झर, किर्लोस्कर, बॉश, एचएसबीसी टेक्नॉलॉजी, इन्फोब्लॉक्स, आरटीकॅम्प, पॉलीकॅब आणि ह्युंदाई इंडिया यांसारख्या प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या मुलाखती यशस्वीरित्या पार पडल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी देश-विदेशातील करिअरच्या नव्या संधी खुल्या झाल्या आहेत.

विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाच्या गरजा आणि आधुनिक भरती प्रक्रियेची ओळख व्हावी, यासाठी संकुलाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अभियांत्रिकी, एमबीए आणि पीजीडीएम विभागातील विद्यार्थ्यांसाठी नुकतेच ‘एचआर सिम्पोजियम’चे आयोजन करण्यात आले होते. कॉर्पोरेट क्षेत्रातील मान्यवरांनी यावेळी विद्यार्थ्यांना कौशल्याधारित भरती प्रक्रिया, करिअर नियोजन, व्यक्तिमत्त्व विकास आणि प्रभावी मुलाखत तंत्र याबाबत मार्गदर्शन केले.

# बालाजीनगर एसआरए प्रकल्प पारदर्शक राबवा

## प्रत्येक पात्र कुटुंबाला न्याय द्या; शंकर कुऱ्हाडे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**बालाजीनगर, भोसरी येथील प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) प्रकल्पात प्रत्येक पात्र झोपडीधारकाला किमान ५०० चौ. फूट क्षेत्रफळाचे घर, कोणालाही अन्यायकारकपणे अपात्र न ठरविणे, संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे राबविणे आणि आधुनिक नागरी सुविधांनी युक्त आदर्श पुनर्वसन प्रकल्प उभारण्याची मागणी करत बालाजीनगरमधील रहिवाशांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे.**



अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते शंकर विठ्ठल कुऱ्हाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच हे निवेदन बालाजीनगर रहिवाशांच्या वतीने मुख्यमंत्र्यांना देण्यात आले असल्याचेही कुऱ्हाडे यांनी सांगितले.

निवेदनात म्हटले आहे की, एसआरए योजनेचा मूळ उद्देश झोपडपट्टीतील नागरिकांना सुरक्षित, सन्मानजनक आणि आधुनिक सुविधांसह जीवनमान उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र अनेक प्रकल्पांमध्ये पात्र नागरिकांवर अन्याय होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असल्याने शासनाने कठोर, लोकहिताचे आणि पारदर्शक निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे. शहराच्या विकासात झोपडपट्टीतील कष्टकरी नागरिकांचे मोठे योगदान असून त्यांच्या पुनर्वसनात कोणत्याही प्रकारचा भेदभाव होऊ नये, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

रहिवाशांनी प्रत्येक पात्र झोपडीधारकाला किमान ५०० चौ. फूट सुसज्ज घर देण्याची मागणी केली आहे. वाढत्या कुटुंबाच्या गरजा लक्षात घेता सध्याचे कमी क्षेत्रफळ अपुरे असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच कोणताही तांत्रिक कारणे किंवा मनमानी निकषांच्या आधारे अपात्र ठरवू नये आणि प्रत्येक पात्र कुटुंबाला पुनर्वसनाचा समान लाभ मिळावा, अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

निवेदनात बालाजीनगरमधील सर्व इमारती सात मजली स्वरूपात उभारण्यात याव्यात, जेणेकरून सर्व पात्र नागरिकांचे पुनर्वसन त्याच परिसरात होईल, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पात २४ तास पाणीपुरवठा, नियमित वीज, स्वच्छता, आधुनिक जलनिस्सारण व्यवस्था, सीसीटीव्ही सुरक्षा, अग्निसुरक्षा, लिफ्ट, दिव्यांगांसाठी सुविधा, वाहनतळ, हिरवळ, मुलांसाठी खेळाची मैदाने, क्रीडांगण, उद्याने, उच्च दर्जाच्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा, सरकारी रुग्णालय, डिजिटल लायब्ररी, अभ्यासिका, ज्येष्ठ नागरिक केंद्र, सर्वधर्मीय प्रार्थनास्थळे आणि सुसज्ज सभागृह उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय विकासकाने प्रत्येक नागरिकाशी मराठी भाषेत स्पष्ट लेखी करार करावा, अधिकृत सार्वजनिक सभा घेऊन सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत, पात्रता यादी तात्काळ प्रसिद्ध करावी, प्रकल्पाचा संपूर्ण आराखडा, घराचा आकार, घरभाडे, बांधकामाचा कालावधी आणि ताबा देण्याची प्रक्रिया नागरिकांसमोर पारदर्शकपणे मांडावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांवर दबाव, धमकी किंवा दिशाभूल करून संमती घेतली जात असल्याच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करावी, पुनर्वसनाच्या कालावधीत शासनमान्य भाडे वेळेवर मिळावे, नागरिकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र हेल्पडेस्क किंवा नोडल अधिकारी नियुक्त करावा तसेच एसआरए प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याची माहिती आणि बैठकींचे इतिवृत्त सार्वजनिक करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागण्यांचा सकारात्मक विचार करून तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा न्याय न मिळाल्यास बालाजीनगरमधील रहिवासी व्यापक जनआंदोलन उभारतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच पुणे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

# NEET मध्ये अतुल्या डोंगरेची दैदिप्यमान भरारी; 670 गुणांसह देशात 498 वा क्रमांक!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET-UG) 2026 मध्ये पिंपरीतील अतुल्या बाळासाहेब डोंगरे हिने 720 पैकी 670 गुण मिळवत अखिल भारतीय गुणवत्ता यादीत (AIR) 498 वा क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे पिंपरी-चिंचवड परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**



> NEET परीक्षेच्या तयारीत मी नियमितता आणि सातत्याला सर्वाधिक महत्त्व दिले. रोजचा अभ्यास त्याच दिवशी पूर्ण करण्याचा आणि कोणताही बॅकलॉग न ठेवण्याचा प्रयत्न केला. पालक, शिक्षक आणि स्वतःवरील विश्वासामुळे हे यश मिळवता आले. पुढे उत्कृष्ट वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षण घेऊन देशात राहून समाजासाठी वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून योगदान देण्याची माझी इच्छा आहे.
>
> – अतुल्या डोंगरे.

लहानपणापासून डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या अतुल्याने हे यश कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिस्तबद्ध नियोजनाच्या जोरावर मिळवले आहे. तिने दहावीपर्यंतचे शिक्षण आयसीएसई बोर्डातून पूर्ण केले, तर अकरावी व बारावीचे शिक्षण सीबीएसई बोर्डातून घेतले. बारावीच्या परीक्षेतही तिने 97.6 टक्के गुण मिळवत शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली.

NEET परीक्षेच्या तयारीदरम्यान अतुल्याने नियमित वर्गांना उपस्थिती, रोजचा अभ्यास त्याच दिवशी पूर्ण करणे आणि कोणताही बॅकलॉग न ठेवणे, या सवयी अंगीकारल्या. अभ्यासातील शंका तत्काळ शिक्षकांकडून दूर करून घेणे, जीवशास्त्रासाठी एनसीईआरटीच्या पुस्तकांचा सखोल अभ्यास आणि भौतिकशास्त्र व रसायनशास्त्रासाठी मोठ्या प्रमाणात प्रश्नसंचांचा सराव, यावर तिने विशेष भर दिला.

आपल्या यशाबद्दल बोलताना अतुल्या म्हणाली, “परीक्षेच्या काळात काही प्रमाणात तणाव होता. मात्र, पालक आणि शिक्षकांचा सातत्याने मिळालेला पाठिंबा आणि स्वतःवरील विश्वास यामुळे मी लक्ष विचलित होऊ दिले नाही. नियमितता आणि सातत्य हीच माझ्या यशाची गुरुकिल्ली ठरली.”

भविष्यातील ध्येयाविषयी ती म्हणाली, “उत्कृष्ट वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून पुढे आवडीच्या विषयात विशेष प्राविण्य मिळवायचे आहे. त्यानंतर देशात राहून वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून समाजासाठी योगदान देण्याची माझी इच्छा आहे.”

अतुल्याचे वडील बाळासाहेब डोंगरे यांनी सांगितले, “डॉक्टर होण्याचा निर्धार तिने बालपणापासून केला होता. त्या दिशेने तिने सातत्याने मेहनत घेतली. आम्ही तिच्या प्रत्येक निर्णयात तिच्या पाठीशी उभे राहिलो. तिच्या यशाचा आम्हाला मनापासून अभिमान आहे.”

आई शर्मिला डोंगरे म्हणाल्या, “अतुल्या लहानपणापासून अभ्यासू, जिद्दी आणि मेहनती आहे. एखादे उद्दिष्ट निश्चित केले की ते पूर्ण केल्याशिवाय ती थांबत नाही. तिच्या मेहनतीचे आज सार्थक झाले असून, तिच्या यशाचा आम्हाला खूप आनंद आहे.”

NEET-UG 2026 मधील या दैदिप्यमान यशामुळे अतुल्या डोंगरेने वैद्यकीय क्षेत्रातील आपल्या वाटचालीचा भक्कम पायाभरणी केली असून, तिच्या पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासासाठी विविध स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station